EDUTECH ACADEMY
NURTURING THE FUTURE....

— SCHOOL SECTION —

# CBSE CLASS 10 - MARATHI (009) Qs PAPER 2025-26

Series JMS/6 SET - 1

**Roll No.** ________________ **Code No. 2/6/17**

**Time: 3 hrs.** **Marks: 80**

**सर्वसाधारण सूचना :**

1. या प्रश्नपत्रिकेत - अ, ब, क, ड - असे चार विभाग आहेत व 9 पृष्ठे आहेत.
2. सर्व विभाग आवश्यक आहेत.
3. यथाशक्य सर्व विभागाची उत्तरे क्रमाने यावीत.
4. एकाच विभागातील सर्व प्रश्नांची उत्तरे क्रमानेच यावीत.

## विभाग - 'अ' - वाचन व आकलन - 15 गुण

**प्रश्न 1) खालील उतारा काळजीपूर्वक वाचा व त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

स्वयंपाकघरातल्या जुन्या तांब्याच्या आणि पितळेच्या भांड्यांची जागा जशी स्टेनलेस स्टीलच्या भांड्यांनी घेतली, तसतशी कल्हई आणि कल्हईवाले दुर्मिळ होत गेले. तांब्या, पितळेची भांडी चकचकीत करून त्यावर कथील धातूचा थर लावण्याचे काम हे कल्हईवाले करत. गल्लीगल्लीतून फिरून 'कल्हईवालाऽऽ' अशी आरोळी ठोकल्यानंतर एखाद्या झाडाखाली कल्हईवाला त्याचे दुकान थाटत असे. तांब्याच्या भांड्यात आंबट किंवा आम्लधर्मी पदार्थ बनवले असता, त्यांच्यात रासायनिक प्रक्रिया होऊन अन्न बिघडण्याची शक्यता निर्माण होते. ही वेळेस अन्नाची चव बिघडते, तर काही वेळेस अन्नपदार्थांच्या रंगात बदल होतो. त्यातून विषबाधा होण्याचा धोका संभवतो. हे टाळावे म्हणून तांब्याच्या आणि पितळेच्या भांड्यांना आतून कल्हई केली जाते.

जमिनीत छोटा खड्डा खणून त्यात भट्टी तयार केली जाते. त्यातील विस्तवावर भांडे आतल्या बाजूने तापवले जाते. पांढऱ्या रंगाची नवसागराची (अमोनिअम क्लोराईड) भुकटी वापरून भांडे आतल्या बाजूने घासून स्वच्छ, लख्ख केले जाते. हे करताना पांढरा, उग्र वासाचा धूर तयार होतो. भांडे गार होण्यापूर्वीच कथील (टिन) धातूचा छोटा तुकडा भांड्यात टाकला जातो. कथील हा मऊ, लकाकणारा, निळसर, पांढऱ्या रंगाचा उपयुक्त धातू आहे. तो पटकन वितळतो. अतिशय कौशल्याने कल्हईवाला तो वितळलेला धातू पटकन भांड्यात सर्वत्र पसरवून त्याचा लेप

देतो, भांडे थंड करण्यासाठी ते थंड पाण्यात टाकले जाते. कल्हई केलेल्या भांड्यात बनवलेले जेवण शरीरासाठी अपाय करत नाही, म्हणून दर काही महिन्यांनी तांब्या-पितळेच्या भांड्यांना कल्हई करणे गरजेचे असते.

**अ) उतारा वाचून त्याआधारे खालील प्रश्नांची उत्तरे पर्यायामधून निवडा. (कोणतेही 5)** **(5 x 1 = 5)**

**I.** तांब्याच्या भांड्यांमध्ये आम्लधर्मी पदार्थ शिजवल्यास काय होण्याची शक्यता असते?

A) भांडी लवकर खराब होतात B) अन्नाची चव सुधारते

C) भांड्यांचा आकार बदलतो D) अन्नाची चव बिघडू शकते किंवा रंग बदलू शकतो

**II.** कल्हई करण्यासाठी कोणता धातू वापरला जातो?

A) ॲल्युमिनियम B) तांबे C) टिन (कथील) D) लोखंड

**III.** कल्हईची प्रक्रिया करताना भांडे कोणत्या पदार्थाने स्वच्छ केले जाते?

A) पाणी B) ॲसिड C) मीठ D) नवसागर (अमोनिअम क्लोराइड)

**IV.** कल्हई केलेले भांडे थंड करण्यासाठी काय केले जाते?

A) उन्हात ठेवले जाते B) पाण्यात टाकले जाते

C) वाळवले जाते D) गोठवले जाते

**V.** कल्हईवाला आपले काम सुरू करण्यापूर्वी गल्लीगल्लीतून कोणती आरोळी देतो?

A) 'तांब्या पितळ!' B) 'कल्हईवालाऽऽ!' C) 'भांडे घ्या!' D) 'कथील घ्या!'

**VI.** कल्हई केल्यानंतर भांडे कोणत्या पाण्यात टाकले जाते?

**A)** गरम B) थंड C) कोमट D) उकळत्या

**ब) खालील प्रश्नांची उत्तरे उताऱ्याच्या आधारे एका वाक्यात लिहा. (कोणतेही 3)** **(3 x 1= 3)**

**(CBQ)**

**I.** नवसागर म्हणजे काय, आणि तो कशासाठी वापरला जातो?

**II.** तांब्याच्या आणि पितळेच्या भांड्यांना ‘कल्हई’ करण्याचा मुख्य उद्देश काय आहे?

**III.** कल्हई करण्याची प्रक्रिया काय आहे?

IV. कल्हई केल्यानंतर भांडे कोणत्या प्रकारे शुद्ध केले जाते?

**प्रश्न 2) खालील कविता काळजीपूर्वक वाचा व त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

माझी भाषा माझी आई अर्थ भावनांना देई
तिच्या राहावे ऋणात होऊ नये उतराई
तिच्या एकेका शब्दाला रत्न-कांचनाचे मोल
कधी तप्त लोहापरी कधी चांदणे शीतल
रानवाऱ्याच्या गंधात माझी मराठी भिजली
लेऊनिया नाना बोली विविध माझी मराठी सजली
माझ्या भाषेचे अमृत प्राशेल तो भाग्यवंत
तिचा नाही दुजाभाव असो कोणताही पंथ
माझ्या मराठी भाषेची काय वर्णावी थोरवी
दूर देशी ऐकू येते माझ्या मराठीची ओवी

**अ) कविता वाचून त्यावर आधारित प्रश्नांच्या उत्तरांचा योग्य पर्याय निवडा. (कोणतेही 4)** **(4 x 1= 4)**

**(CBQ)**

**I.** कवीने कोणत्या गोष्टीची तुलना आईशी केली आहे?

A) देशाशी B) भाषेशी C) निसर्गाशी D) ज्ञानाशी

**II.** कवीच्या भाषेत शब्दांचे मोल कशासारखे आहे?

A) सोन्यासारखे B) रत्न-कांचनासारखे C) पैशासारखे D) मोत्यासारखे

**III.** मराठी भाषेत कोणते घटक मिळून सजले आहेत?

A) विविध ऋतू B) नाना बोली C) अनेक पंक्ती D) विविधरंग

**IV.** मराठी भाषेचे अमृत प्राशन करणारा कोण ठरतो?

A) ज्ञानी B) श्रीमंत C) भाग्यवंत D) पराक्रमी

V. मराठी भाषा कोणत्या गंधात भजली आहे?

A) रानवाऱ्याच्या B) उन्हाच्या C) पावसाच्या D) हिवाळ्याच्या

**ब) कवितेच्या आधारे खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही 3)** **(3x1=3)**

**(CBQ)**

I. मराठी भाषेची थोरवी कोठे ऐकू येते?

II. मराठी भाषेचा चांदण्यासारखा कोणता गुण कवितेत नमूद केला आहे?

III. कवितेनुसार मराठी भाषा कोणत्या प्रकारचे ज्ञान देते?

IV. कवीने मराठी भाषेला कोणत्या स्वरूपात गौरवले आहे?

V. 'उपकार' या शब्दासाठी कवितेत आलेला समानार्थी शब्द शोधून लिहा.

## विभाग – ब – व्याकरण – 20 गुण

**प्रश्न ३) अ) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही 4)** **(CBQ)** **(4x1=4)**

I. प्रत्येकामध्ये प्रामाणिकपणा असावा. (भाववाचक नाम ओळखा)

A) प्रत्येकामध्ये B) प्रामाणिकपणा C) असावा D) यापैकी नाही

II. 'तो, ती, तुम्हाला, मी' या शब्दांना व्याकरणातील शब्द जातीत काय म्हणतात?

A) केवलप्रयोगी अव्यय B) उभयान्वयी अव्यय C) नाम D) सर्वनाम

III. त्यांचे माझ्यावर उपकार आहेत. (शब्दयोगी अव्यय ओळखा)

A) त्यांचे B) माझ्या C) वर D) उपकार

IV. पावडेकाकांचे पाय ----- दिसत होते. (दिलेल्या वाक्यात योग्य विशेषणाचा वापर करा)

A) हुशार B) पाच C) नाजूक D) चरण

V. मुले पळत निघाली, ----- लवकर पोहोचली. (योग्य उभयान्वयी अव्ययाचा वापर करा)

A) म्हणून B) परंतु C) अथवा D) किंवा

**ब) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही 3)** **(CBQ)** **(3 x 1= 3)**

I. राम दररोज ग्रंथालयात जात असे. (वर्तमानकाळातील वाक्य तयार करा)

II. लिंबाचा रस पंतांना अमृतासारखा वाटू लागला. (काळ ओळखा)

III. अभिषेकने पायांचे ठसे पाहिले. (भविष्यकाळात वाक्य तयार करा)

**IV.** नेहा सिनेमा बघत आहे. (काळ ओळखा)

**क) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही 3) (CBQ) (3 x 1= 3)**

**I.** मला ते पुस्तक आवडले. (वाक्य प्रकार ओळखा)

**II.** त्याच्या बोलण्यात असत्यता नव्हती. (होकारार्थी वाक्यात रुपांतर करा)

**III.** तू व्यायाम करायला पाहिजे. (आज्ञार्थी वाक्यात रुपांतर करा)

**IV.** केवढा मोठा आहे तुझा अवाका! (विधानार्थी वाक्य करा)

**ड) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही 2) (2 x 1= 2)**

**I.** खेडे, वेडे, झाडे, वाडे - या शब्दांपैकी एकवचनी शब्द ओळखा.

**II.** दोरी - या शब्दाचा अनेकवचनी शब्द लिहा.

**III.** तिने दारात रोप लावले. (अधोरेखित शब्दाचे वचन बदलून वाक्य पुन्हा लिहा)

**४. अ] सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. [कोणतेही 2] (2 x 1= 2)**

**I.** खालील गटातील भिन्नलिंगी शब्द ओळखा.

A) दगड B) शाळा C) कवी D) पूल

**II.** लिंग विचारानुसार गटात न बसणारी शब्दजोडी ओळखा.

A) दास - दासी B) रस्ता - रस्ते C) म्हैस - रेडा D) युवक – युवती

**III.** पक्षिणी- या शब्दाचे लिंग बदला.

A) पक्षी B) पक्ष C) पक्ष्या D) पंछी

**ब] सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही 2) (CBQ) (2 x 1= 2)**

**I.** खालीलपैकी गटात न बसणार शब्द कोणता?

A) सुरुवात B) अंत C) आरंभ D) प्रारंभ

**II.** उत्कंठा - समानार्थी शब्द लिहा.

A) उचकी B) इच्छा C) कुतूहल D) यापैकी नाही

**III.** खालीलपैकी समानार्थी शब्दाची जोडी ओळखा.

A) देवाण - घेवाण B) जगणे - मरणे C) सावकाश - जलद D) पुसट – अस्पष्ट

**क] सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही 2)** **(2 x 1= 2)**

**I.** पुढील शब्दाचा विरुद्धार्थी शब्द ओळखा - विरोध

A) शोध B) थांबणे C) बिनविरोध D) असहाय्य

**II.** खालीलपैकी विरुद्धार्थी शब्दांची योग्य जोडी कोणती?

A) जुना × नवीन B) हुशार × बुद्धिमान C) कोमल × नाजूक D) पळणे × धावणे

**III.** पौर्णिमा- या शब्दाचा योग्य विरुद्धार्थी शब्द निवडा.

A) पुनव B) अमावस्या C) रात्र D) दिवस

**ड] सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही 2) (CBQ)** **(2 x 1= 2)**

**I.** त्रिनेत्र - या समासाचा योग्य विग्रह ओळखा.

A) तीन नेत्रांचा समूह B) दोनडोळे गट C) त्रिनेत्र वगैरे D) तीन आणि नेत्र

**II.** खालीलपैकी समास प्रकारांच्या आधारे गटात न बसणारा शब्द कोणता?

A) यशापयश B) खरेखोटे C) पापपुण्य D) एकवीस

**III.** त्याने गावी <u>शेतीवाडी</u> खरेदी केली. [अधोरेखित शब्दाचा समास ओळखा]

A) अव्ययीभाव B) इतरेतर द्वंद्व C) वैकल्पिक द्वंद्व D) समाहार द्वंद्व

## विभाग –'क' – पाठ्यपुस्तक आधारित – 30 गुण

**प्रश्न 5. अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही 3) (CBQ)** **(3 x 1= 3)**

**I.** अब्दुल वर्षातून किती वेळा तपोवनात जात असे?

**II.** स्वच्छतेची भोक्ती कोण होती?

**III.** ''या शाली घेऊन घेऊन मी आता शालीन बनू लागलो आहे,'' असे कोण म्हणाले?

**IV.** डॉ. माशेलकरांनी 'माझे संस्कार केंद्र' असे कोणाबद्दल म्हटले आहे?

**V.** कथेची थोरली बहीण कोण?

**ब) खालील वाक्यांतील रिकाम्या जागी योग्य शब्दाचा पर्याय शोधून वाक्ये पुन्हा लिहा. (कोणतेही 3)** **( 3 x 1= 3 )**

**I.** ना तिकीट, ना व्हिसा, ना बस, ना ----- मी कुठेही जाऊ शकतो.

A) बस B) मोटार C) विमान D) ट्रक

**II.** बांगड्या भरल्यानंतरचा त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद अब्दुलला ---------- वाटे.

A) लाखमोलाचा B) बिनमोलाचा C) हजारमोलाचा D) कवडीमोलाचा

**III.** भिंगाच्या साहाय्यानं ------- शक्ती कागदावर एकत्र केल्यास कागद जळतो हे त्यांनी दाखवलं.

A) चंद्रकिरणांची B) सौरकिरणांची C) शतकिरणांची D) सूर्यकिरणांची

**IV.** ---------- गुरुजींनी त्याला थोरामोठ्यांच्या घरी वार लावून दिले.

A) भावे B) भडसावळे C) शिर्के D) जोशी

**V.** भुकेल्यास अन्न द्यावे, तहानलेल्यास पाणी द्यावे आणि हेही जमले नाही, तर ------ सन्मानाच्या शाली तरी द्याव्यात!

A) पाहुण्यांना B) जवळच्यांना C) अध्यक्षांना D) अभाग्यांना

**क) खालील प्रश्नाचे ३० ते ४० शब्दात उत्तर लिहा. (कोणतेही 1) (CBQ)** **(1 x 3= 3)**

**I.** दोरीवरच्या उड्या मारण्याच्या प्रसंगातील तुम्हांला समजलेला विनोद स्पष्ट करा.

**II.** 'आपल्या पायांचे वातावरणावर उमटलेले ठसे, आपल्याला सहजतेने पुसता येत नाहीत,' तुम्हांला कळलेला अर्थ स्पष्ट करा.

**III.** तुम्हांला अभिप्रेत असलेली आदर्श विद्यार्थ्याची गुणवैशिष्ट्ये लिहा.

**ड) खालील वाक्यांतील वाक्प्रचार ओळखा व त्याचा अर्थ कंसातील कोणत्या वाक्प्रचारांशी जुळतो ते लिहा. (CBQ)** **(5 x 1= 5)**

( खूप आनंद वाटणे, रिकामा वेळ न मिळणे, निपुण असणे, प्रभावित होणे, नाराजी व्यक्त करणे, प्रेमाने जवळ घेणे )

**I.** असं म्हणून गुरुजींनी निरंजनला हृदयाशी धरले.

**II.** 'ज्ञानपीठ' पुरस्कार ययाति या कादंबरीला मिळाला, तेव्हा मराठी माणसांचा ऊर अभिमानानं भरून आला.

**III.** बाबांनी अनाठायी टेक्नॉलॉजीबद्दलची आपली मळमळ व्यक्त केली.

**IV.** मला काही कामांमुळे संध्याकाळी ओंकारेश्वराला जाण्यास उसंत लाभली नाही.

**V.** वजन उतरवण्याच्या शास्त्रात पारंगत झालेले तज्ज्ञ मला रोज डझनवारीने भेटू लागले.

**प्रश्न 6. अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे दया. (कोणतेही 4) (CBQ)** **(4 x 1= 4)**

**I.** चातक पक्षी कोणाची विनवणी करतो?

II. नारायण सुर्वे यांनी चंद्राला कशाची उपमा दिली आहे?

III. जवानाचे औक्षण कोण करत आहे?

IV. कवी कशाची नौबत झडते असे म्हणतात?

V. संत नामदेवांनी स्वतःला कोणाचा दास म्हटले आहे?

VI. कष्टाचे सामर्थ्य अपुरे केव्हा वाटते?

**ब) खालील वाक्यांतील रिकाम्या जागी योग्य शब्दाचा पर्याय शोधून वाक्ये पुन्हा लिहा. (कोणतेही 4)** **( 4 x 1= 4 )**

I. तैसा धांवें माझिया -----------| अंकिला मी दास तुझा |

A) धामा B) कामा C) काजा D) साजा

II. वर घोंघावे ------------------, पुढे कल्लोळ धुराचे.

A) बंबारा B) गोळा C) बॉम्ब D) तोफ

III. नव्या पिढीचे, नव्या------------ स्वप्न करू साकार.

A) विश्वाचे B) देशाचे C) युगाचे D) लोकांचे

IV. कधी माना उंचावलेले, कधी --------------- झालेले पाहिले.

A) सुटलेले B) तुटलेले C) कलम D) छाटलेले

V. फुलामुलांतून हसतो ---------------- मातीचे हो मंगल तनमन.

A) चैत्र B) श्रावण C) वैशाख D) जेष्ठ

**क) खालीलपैकी एका काव्यपंक्तीचे संदर्भासह स्पष्टीकरण करा. ( कोणतेही 1) (CBQ)** **( 1 x 3=3)**

I. हे हात माझे सर्वस्व; दारिद्याकडे गहाणच राहिले

II. तुझी विजयाची दौड डोळे भरून पहावी ;
डोळ्यांतील आसवांची ज्योत ज्योत पाजळावी.

**प्रश्न 7. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही 5) (CBQ)** **( 5 x 1=5)**

I. मराठीतील ‘आग’ हा शब्द कोणत्या भाषेतून आला आहे?

II. लेखकाने ‘बार्क’ मधील किती अनुभव सांगितले आहेत?

III. १९३८ साली मुंबई येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष कोण होते?

IV. ‘मोठे होत असलेल्या मुलांनो’ या पाठात लेखकाला कोणत्या प्रक्रियेवर काम करायला सांगण्यात आले?

V. व्युत्पत्ती म्हणजे काय?

VI. भारतातील अणुसंशोधनाचा पाया कोणी घातला?

VII. मराठी व्युत्पत्ती कोशाचे पहिले प्रकाशन कोणत्या साली झाले?

## विभाग - ड – लेखन कौशल्य – 15 गुण

**८. अ) दिलेले निबंध मुद्दे व कथा मुद्दे नीट वाचा व दिलेल्या पाच विषयांपैकी कोणत्याही एका विषयावर 120 – 150 शब्दांत निबंध अथवा कथा लिहा. (कोणतेही 1 ) (CBQ) ( 5 x 1=5)**

**निबंधाविषय व मुद्दे**

I. आवडता ऋतू - [मुद्दे - आवडत्या ऋतूचे नाव ---- कोणत्या महिन्यात असतो ------ वातावरणात त्यामुळे होणारे बदल ---- तुम्हाला आवडण्याची कारणे.]

II. शास्त्रज्ञ झालो तर….. ! - [मुद्दे- आजचे युग विज्ञानाचे युग--- विज्ञानाचे चमत्कार पाहून मनात विचार--- मी शास्त्रज्ञ झालो तर-----विज्ञानाचे उच्च शिक्षण घेईल--- वैज्ञानिक संस्थांची निर्मिती करेल---सर्व गोष्टी, वस्तू, औषधे देशात बनविणे--- प्रयोगशाळेत देशास उपयुक्त गोष्टींवर काम करेल---- माझा शोध सर्व सर्व मानवाच्या कल्याणासाठी.]

III. शालीची आत्मकथा - [मुद्दे: प्रवासात थंडी -----अंगावर शाल ----शाल बोलत होती - - - शालीची निर्मिती कोठे व कधी--- तुझ्या बाबांच्या सत्कारामुळे घरी आले---- आता जीर्ण - - - तुझी आई मला जपायची----तुझ्याकडे आले - - - आता तू माझी काळजी घे.]

**किंवा**

**कथाविषय व मुद्दे – शीर्षक व तात्पर्य आवश्यक**

I. एक व्यापारी - - - खूप पैसे घेऊन गावी निघतो--- वाटेत चोर--- दोघेही रात्री धर्मशाळेत चोर रात्री व्यापाऱ्याच्या पिशव्या तपासतो--- काहीही मिळत नाही - - - व्यापाऱ्याची युक्ती--- व्यापारी चोराच्या उशीखाली पैसे ठेवतो--- चोर दुसऱ्या दिवशी चकीत - - - निराश---तात्पर्य.

II. एक फुलांचे गाव -------- एक दगडांचे गाव ---- दगडांना फुलांचा राग ----- फुलांचीच स्तुती --- दगडांना किंमतच नाही ------ एकदा दोन्ही गावात भांडण ----- फुलांवर हल्ला ---- फुले ठेचली जातात ----- तरी त्यांचे हास्य ----- दगडांना आश्चर्य --------- फुलांचे उत्तर ------ जितके अधिक चिरडता तितका सुगंध पसरतो ----- तात्पर्य.

**ब) खालील विषयावर पत्र लिहा. (लिफाफा आवश्यक) (कोणतेही 1) (CBQ) ( 5 x 1=5)**

**I.** संतोष / सीमा काळे, लक्ष्मीनगर, सातारा येथील सार्वजनिक उद्यानातील दुरावस्थेबाबत तक्रार करणारे पत्र व्यवस्थापक, उद्यानविभाग, सातारा यांना लिहितो / लिहिते.

**II.** जीवन / जिया काळे, विद्यार्थी प्रतिनिधी, रमणबाग प्रशाला, गंगापूर रोड, नाशिक या शाळेला ५० वर्षे पूर्ण झाल्याने शाळेची सजावट करायची असून त्यासाठी लागणाऱ्या साहित्याची मागणी करणारे पत्र मा. व्यवस्थापक, देविका सजावट भांडार, मदिना चौक, रेणुका नगर, नाशिक यांना लिहितो / लिहिते.

**क) खालील दिलेल्या विषयावर जाहिरातलेखन करा. (कोणतेही 1) (CBQ) (5 x 1=5)**

**I.** पुस्तकाच्या दुकानाची जाहिरात तयार करा.

**II.** योगासने शिकविणाऱ्या वर्गाची जाहिरात तयार करा.

**....ALL THE BEST ....**

EDUTECH ACADEMY
NURTURING THE FUTURE....
SCHOOL SECTION

**CIDCO BRANCH**
9168 444 999
1ST FLOOR, INFRONT OF BALIRAM PATIL SCHOOL
**HARSUL-SAWANGI BRANCH**
9168 044 999
1ST FLOOR, INFRONT OF PANAD SUPER MARKET